# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०२/११/२०१८ रोजी (का.प.क्र.१३) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक ०२/११/२०१८ रोजी (का.प.क्र.१३) मा.सभापती श्री.रेणुकादास(राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी १०:०८ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०४. स.स.श्री.सय्यद मतीन रशीद
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०७. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०८. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०९. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
१०. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
११. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१२. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१३. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : मा.महापौर यांच्या जेष्ठ भगीणी आणि स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांच्या सासुबाई श्रीमती शकुंतला मोहन, श्री.गजानन बारवाल यांचे काका श्री.रोहिदास बारवाल यांचे आणि जेष्ठ कवी श्री.यशवंत देव यांचे सुध्दा दु:खद निधन झाले आहे. यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

(जो श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडला त्यास श्रीमती.स्वाती नागरे, सत्यभामा शिंदे यांचे अनुमोदन आहे.)

मा.सभापती :जेष्ठकवी स्व.यशवंत देव, स्व.शकुंतलाबाई मोहन आणि स्व.रोहिदास बारवाल यांचे सुध्दा दु:खद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे २ मी.उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

श्रीमती.शेख नरगीस : वार्डामध्ये ९ दिवसानंतर पाणी येत आहे. खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(पा.पु) : दिल्ली गेटची टाकी ही हर्सुलवर टिफेंन्ट आहे आणि आताहर्सुला शुन्य टक्के पाणी साठा आहे. अशा परिस्थितीमध्ये शहागंजवरुन पाणी उचलुन दिल्ली गेटच्या टाकीवर टाकावे लागते. आणि पंपीगद्वारे ला टाकीत पाणी टाकतो आहे.बऱ्याच वेळेस पंपीगंचा प्रोब्लेम येत असतो आणि दोन दिवसाच्या शट्डाऊनमुळे ग्याप पडला आहे. एक तास पाणी सप्लायच्या ऐवजी दिड दिड तास पाणी चालु असते. लाईनमनला वाल बंद करु दिले जात नाही.

मा.सभापती : असे उत्तर अपेक्षित नाही. तुम्हाला नियोजन करता येत नाही का? जो कोणी कामामध्ये अडथळा निर्माण करत असेल तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा.

श्रीमती.सायरा बानो : शहागंजच्या पाणी टाकीजवळ स्तंभ बांधण्याचे नियोजन केले होते. ते नियोजन सभेसमोर आले का? त्याचा खुलासा द्यावा.

कार्य.अभियंता(पा.पु) : शहागंज येथे सम बांधण्याबाबत प्रश्न उपस्थित केला त्याबाबत जे तांत्रिक सल्लागार नियुक्त केले आहे ते त्यांच्या पुढे हा प्रश्न उपस्थित करुन योग्य नियोजन केले जाईल.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : वार्डामध्ये पाणी पुरवठा सुरळित होत नाही. सातव्या दिवशी पाणी येत आहे. दोन कॉलनीमध्ये पाणी येत नाही. याचे काही नियोजन करण्यात यावे.

श्रीमती.शेख नसरीन : वार्ड क्र.५० मध्ये पाणी सोडण्यासाठी लाईनमन नाही.

मा.सभापती : कुठल्याही परिस्थितीत पाणी पुरवठा विस्कळीत होणार नाही याची काळजी घ्यावी. जिथे शंका असले तिथे ताबडतोब कार्यवाही करावी. आणि वार्ड क्र.५० मध्ये लाईनमन नाही तिथे ताबडतोब एक पाणी पुरवठा लाईनमन देण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल : पाण्याच्या बाबतीत सर्व वार्डांचे योग्य नियोजन केले पाहिजे.

श्रीमती.शेख नरगीस : श्री.केंद्रे यांचे बाबतीत पत्र दिले होते त्याची माहिती मागवली होती ती आता पर्यंत देण्यात आलेली नाही.

मुख्य लेखाधिकारी : पत्र मिळाले नाही. पत्र व त्या संबंधीची माहिती घेऊन आजच देतो.

श्री.रुपचंद वाघमारे : माझ्या वार्डातले दोन वर्षा पुर्वीचे बिल आहेत. दोन महिन्यापासुन एक बिल देण्यासाठी पाठपुरावा केला परंतु एक सुध्दा बिल देण्यात आले नाही.

मा.सभापती : सर्व स.सदस्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्या वार्डातले विकास कामांचे देयक तातडीने दिले गेले पाहिजे. पुर्वीचे जर बिल काढले नाही तर कंत्राटदार वार्डातले कामे घेणार नाही. वृत्तपत्राच्या माध्यमातुन माहिती मिळाली की, १८ कोटीचे बिले काढली त्याचे काय नियोजन कसे होते? कशाच्या आधारे काढण्यात आले? याचा सविस्तर खुलासा करावा.

मुख्य लेखाधिकारी : आपल्याकडे जो निधी उपलब्ध होता त्यामधुन प्राधान्यक्रम ठरलेला आहे. सिनॅरिटी लिस्ट नुसार आणि मा.आयुक्तांच्या त्यामध्ये काही सुचना होत्या. प्रथम प्राधान्य वॉटर सप्लाय मेंटेन्स आणि रिपीअरचे १,३८,५१,५२५/- रु. देयक दिली आहे.

मा.सभापती : १८ कोटी रुपयाचे देयक काढल्यावर वॉटर सप्लाय मेंटेन्स आणि रिपीअरचे फक्त एकच कोटी रुपयाचे देयक देता. दिड दोन वर्षापासुन ठेकेदारांना पैसे भेटत नाही.

श्री.रुपचंद वाघमारे : मा.आयुक्तांनी सांगितले आहे का की, सिनॅरिटी डावलून नव्याने जे बिल आलेत ते द्यावे.

मा.सभापती : १८ कोटी पैकी फक्त दिड कोटी प्रथम प्राधान्य क्रमाला देता मग उर्वरित साडे सोळा कोटीमध्ये कोणते बील अदा केले ते पण सांगावे.

मुख्य लेखाधिकारी : लाईट मेंटेन्सचे ३ कोटी १९ लक्ष पेमेंट झालेले आहेत.

श्री.गजानन बारवाल : प्राधान्य क्रम ठरवायचे हा अधिकार फक्त सभापतीचा आहे. तुम्ही फक्त दिड कोटी रुपयाचे पाण्याचे बिल देतात,लाईटचे तीन कोटीने देतात. उर्वरीत बील कुणाला दिले.

मा.सभापती : तुम्ही प्रथम प्राधान्य पाण्यासाठी आहे त्याला दिड कोटी आणि सेकंड प्राधान्य लाईटला आहे त्याला ३ कोटी देता. बाकीच्या रक्कमा कुणाला अदा केले.

श्रीमती.स्वाती नागरे : १८ कोटी रुपये कुठे-कुठे खर्च केले? याची पुर्ण सविस्तर माहिती देण्यात यावी.

मुख्य लेखाधिकारी : वॉटर सप्लाय मेंटेन्स आणि रिपीअरचे १,३८,५१,५२५/- रु. आणि वॉटरचेच व्हावचर स्वरुपातील १७,९९,२१७/- रुपये, लाईटचे मेंटेन्स आणि रिपीअरचे ३,१९७,६३८ रुपये, मेंटेन्स आणि रिपीअर रोडचे ३,७२,९७,९१९/- रुपये, जनरल बी-१ चे २,५७,१०,५३७/- रुपये आणि

मा.सभापती : यामध्ये प्राधान्य क्रम दिसत नाही. याच्यापुढे कुठलेही देयक देत असतांना स्थायी समितीला विचारल्या शिवाय देयक काढु नये अन्यता कारवाई करण्यात येईल.

श्री.अब्दुल नविद : श्री.केंद्रे मुख्यलेखाधिकारी फोन उचलत नाही.

मा.सभापती : स.नगरसेवकांचे फोन उचलले पाहिजे याची नोंद घ्यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : मागच्या दोन तीन बैठकी पासुन फायर एनओसी बाबत चर्चा केली त्याचा अहवाल मिळलेला आहे. हा अहवाल पाहिल्यानंतर असे लक्षात आले की, चार ठिकाणी अंतिम फायर एनओसी चे पूर्वी तपासणीसाठी ठेवा असा शेरा दिला होता परंतु तपासणीचा अहवाल सादर न करता अंतिम फायर एनओसी दिलेली आहे. हे कसे होऊ शकते.

मा.सभापती : श्री.सुरे आलेले नाहीत आल्यावर हा विषय घेऊ.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : पार्किंगच्या जागेच्या संदर्भात संबंधीत विभागाला पत्र दिले होते परंतु अजुन सुध्दा त्याचे उत्तर मिळालेले नाही.

सहा.संचालक(नगररचना) : माझ्या कडे पत्र आलेले नाही. बघुन सांगतो.

मा.सभापती : संबंधीतांना सुचना द्या कुठल्याही स.नगरसेवकांनी माहिती मागितली तर ती सात दिवसाच्या आत मिळाली पाहिजे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : बांधकाम परवानगी देतांना जे स्वच्छतागृह दाखवलेत त्या ठिकाणी बिल्डर्स्ने घरे बांधुन विकले आहे. हे योग्य नाही.

मा.सभापती : असे काही झाले असेल तर तातडीने कार्यवाही करावी.

सहा.संचालक(नगररचना) : पार्किंगसाठी जी मोहिम राबणार आहोत त्यावेळी स्वच्छतागृहाची सुध्दा एकत्रित मोहिम राबविण्यात येईल.

मा.सभापती : पंधरा दिवसात पुर्ण कामे करावी.

श्री.ऋषिकेश खैरे : मागच्या मिटींगमध्ये अतिक्रमाचा विषय उपस्थित केला होता त्यावर अजुन सुध्दा काहीच कार्यवाही झाली नाही.

कार्य.अभियंता(अति) : समर्थनगर भागातील बिल्डींग इन्स्पेक्टर ते सध्या तिथे नाही त्या प्रकरणाचा पाठ पुरावा करतो. स्वतः त्यामध्ये लक्ष घालुन कार्यवाही करतो.

मा.सभापती : तुमच्याकडे संचिका मागुन घ्यावी आणि आजच्या आज आवश्यकती कार्यवाही करावी.

श्री.सय्यद मतीन : भावसिंगपुऱ्याची टीडीआरची फाईल बाबत मागच्या बैठकीत सुध्दा बोललो होतो त्याचे काय झाले. माहिती द्यावी.

सहा.संचालक(नगररचना) : यामध्ये दोन फाईल मिसिंग होत्या त्या पैकी एक फाईल मिळाली आहे. एका फाईल संदर्भात सर्व कर्मचाऱ्यांना पत्र देण्यात आले आहे. चुकून कोणाकडे फाईल आली असेल तर तीन दिवसात ती द्यायची आहे.

श्री.सय्यद मतीन : मागच्या बैठकीत रोशन गेटची डीपी काढण्यासाठी आदेश दिले होते आणि श्री.देशमुख यांनी पंधरा दिवसात काढतो असे सांगितले होते परंतु अद्याप सुध्दा यावर काहीच कार्यवाही झाली नाही.

कार्य.अभियंता(विद्युत) : रोशन गेटच्या डीपी संदर्भात कोटेशन लेखा विभागात सही करिता दिले आहे. आणि त्यांनी दोन दिवसात धनादेश काढतो म्हणुन सांगितले होते.

मुख्य लेखाधिकारी : लेखा विभागामध्ये सगळ्या संचिका येतात. खात्री करतो माझ्याकडे आले असेल तर लगेच काढुन देतो.

मा.सभापती : विभागामध्ये फोन लावा कुढे आहे ते आणा आणि चेक लगेच काढुन द्या.

श्री.सय्यद मतीन : डिपी किती दिवसात शिफ्ट होईल ते सांगावे.

कार्य.अभियंता(विद्युत) : रक्कम भरल्या नंतर एक महिला लागेल.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : कचऱ्याची समस्या खुप मोठी आहे. माझ्या वार्डात कचरा जास्त प्रमाणात येत आहे. आणि मोठी गाडी आठवड्यातुन फक्त तीन दिवस देण्यात येते. ड्रायवेस्ट कचरा आज पर्यंत नेण्यात आलेले नाही. ओल्या कचऱ्यासाठी रोज गाडी पाठवण्यात यावी.

मा.सभापती : श्री.भोंबे हे खाम नदीच्या इंन्स्पेक्शनसाठी गेले आहे. अति.आयुक्त खुलासा करतील.

मा.अति.आयुक्त : ओला कचरा पडेगाव, हर्सुल, कांचनवाडी आणि चिकलठाणा या साईटवर नेला जातो. आणि सुखा कचऱ्यासाठी एजन्सी नेमली होती तीचा काही प्रोब्लेम झाला होता त्यामुळे बंद होते. परंतु दोन दिवसापासुन चार पाच गाड्या चालु आहे. वार्डातला सुखा कचरा नेण्यासाठी वार्ड ऑफिसरला सुचना देतो. मोठ्या गाडीसाठी सुध्दा सुचना देण्यात येते.

श्री.गजानन बारवाल : नाले साफ सफाईच्या विषयाबाबत कागदीनगर, मुकूंदवाडी, पदमपुरा या भागातुन जाणारा नाला पुर्ण पणे बाद झाला आहे. याचा आठ दिवसापासुन सर्व आधिकाऱ्यांशी पाठ पुरावा करत आहे. हे काम कोण करणार आहे याची माहिती देण्यात यावी. नाल्याचा प्रवाह हा रेगुलर व्हायला पाहिजे.

मा.अति.आयुक्त : झोन ऑफिसर यांचे अंतर्गत मोठ्या नाल्यातील गाळ काढु शकत नाही हे काम हे काम टेंडर प्रोसेस करुन करता येईल.

श्रीमती.स्वाती नागरे : जेष्ठ नागरीक कर भरायला आल्यावर त्यांना बसण्यासाठी जागा नसते. ऑनलाईनमध्ये पाच टक्के सुट मिळाली का नाही त्याचा सुध्दा खुलासा झालेला नाही.

श्रीमती.राखी देसरडा : मागच्या मिटींगमध्ये सर्व सदस्यांनी मांगणी केली होती की, जे कर भरणारे वार्ड आहेत त्यांना पैसा त्यांच्याच वार्डात खर्च व्हावा. वार्डातले कामे झाली पाहिजे.

मा.सभापती : धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार हा सर्वसाधारण सभेचा आहे. सर्वसाधारण सभेमध्ये एक प्रस्ताव दाखल करावा. यावर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेऊ.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : वसुलीसाठी कर्मचाऱ्यांना जे उद्दिष्ट दिलेले आहे ते ग्रुप निहाय दिले की कर्मचारी निहाय दिले.

मा.अति.आयुक्त : वसुलीसाठी झोन ऑफिसरांना एकुण शहराचा साडे चारशे कोटी रु. टारगेट दिले आहे. प्रत्येक वसुली पथकाला आठवड्याचे टारगेट दिले आहे.

श्री.गजानन बारवाल : कंपनी ब्लॅकलिस्ट बाबतचा विषय आणि वाटाघाटीचा विषय आहे याबाबत खुलासा पाहिजे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : जी कंपनी ब्लॅकलिस्टे आहे त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : याचा खुलासा करण्यासाठी योग्य अधिकारी पाहिजे. मा.आयुक्तांकडुन खुलासा पाहिजे. खुलासा करण्यासाठी जबाबदार अधिकारी पाहिजे.

मा.सभापती : श्री.डी.पी.कुलकर्णी हे मा.कोर्टामध्ये आहे. त्यांचे काम झाले असेल तर त्यांना बोलावुन घ्यावे. सभा तो पर्यंत तहकुब करण्यात येते. पुन्हासभा दुपारी ४:३० वाजता सुरु करण्यात येईल.

(पुन्हा सभा दुपारी ४:३० वाजता सुरु करण्यात आली.)

श्री.गजानन बारवाल : डीपी कुलकर्णी यांचे मा.कोर्टामध्ये काय झाले? कंपनी ब्लॅकलिस्ट आहे की नाही याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : मा.कोर्टामध्ये काय झाले त्याची माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता : मा.उच्च न्यायालयामध्ये श्री.रुपेन जैस्वाल यांच्या विरुध्द महानगरपालिका इतर यांचे पीआयएल रस्त्याच्या खड्डयांबाबत आणि रस्त्यांबाबत तीन वर्षापासुन चालु आहे. या पीआयएलमध्ये मागच्या तारखेला मा.उच्च न्यायालयामध्ये संबंधीत असे सादर केले की, शंभर कोटीचे रस्ते महानगरपालिकेतर्फे होत नाही. या संदर्भात मा.कोर्टाने मागच्या तारखेला असे आदेश दिले की, २ नोव्हेंबर पर्यंत महानगरपालिकेने निर्णय घ्यावा. सदरील काम महानगरपालिकेकडुन पीडब्ल्युडीला देण्यात येईल. त्या संबंधाने आज मा.कोर्टामध्ये तारीख होती. मा.स्थायी समितीमध्ये जे चार प्रस्ताव ठेवलेले आहेत ते मा.न्यायालयामध्ये सादर केले. त्यांनी विचारणा केली की, यावर काय निर्णय घेणार आहे? त्यांना सांगण्यात आले की, मिटींग चालु आहे निर्णय होईल. त्यांनी सांगितले की, आज निर्णय घ्यावा असे आदेशित केले आहे. आणि पुढील तारीख त्यांनी २१ नोव्हेंबर ठेवलेली आहे.

श्री.गजानन बारवाल : चार पैकी काही कंपनी ब्लॅकलिस्टेड का आहे?

मा.सभापती : वृत्तपत्रामध्ये वाचले की काही कंपन्या ब्लॅकलिस्टेड आहे. अनेक लोकप्रतिनिधी यांनी या संदर्भात महापालिका प्रशासनाला या स्वरुपात पत्र दिले आहे. त्यामध्ये स्पष्ट असे म्हंटले आहे की, सदरील कंपन्या ब्लॅकलिस्टेड असतांना त्यांना काम का देण्यात येत आहे? या चारही प्रस्तावाच्या अनुषंगाने कुठलीही कंपनी ब्लॅकलिस्टेड आहे का? याबाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता : महानगरपालिकेतर्फे शंभर कोटी रस्त्याच्या कामाची पी-१, पी-२, पी-३, पी-४ अशी चार वर्ग करण्यात आली आहे. याची एकुण किंमत साधारणतः ९९ कोटी आहे. चार एजन्सि वेग-वेगळ्या प्रमाणे घेतल्या आहेत. त्यातील दोन एजन्सि जीएनआय इंफ्रास्ट्रक्चर आणि

मस्कट कंट्रक्शन याबाबत वारंवार तक्रारी आल्या की ह्या ब्लॅकलिस्ट असतांना महानगरपालिका यांना काम देत आहे. ब्लॅकलिस्ट असल्याची माहिती महापालिकेला नाही. तक्रारी प्राप्त झाल्यावर संबंधीत पैठण आपेगाव प्राधिकरणाचे काम करणारे कार्यकारी अभियंता सार्वजनिक विभाग बांधकाम विभाग औरंगाबाद यांना व सिडको विभागाला पत्र देण्यात आले की, आपण यांना ब्लॅकलिस्ट केले आहे का? याची माहिती त्यांच्याकडुन मागवण्यात आली. त्यांनी आपल्या पत्राच्या उत्तरी सिडकोने दि.२२.१०.२०१८ रोजी व सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद, सदरील बांधकाम परिसर औरंगाबाद येथील कार्यकारी अभियंता यांनी दि.२२.१०.२०१८ रोची पत्राद्वारे कळविले आहे की हे ब्लॅकलिस्ट नाही आहे.

श्री.गजानन बारवाल : त्यांना ब्लॅकलिस्ट कोणी केले होते?

कार्यकारी अभियंता : ब्लॅकलिस्ट केले होते किंवा नव्हते यांची माहिती नाही. पत्राद्वारे जे प्राप्त झाल्या आहे त्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना विचारणा केली होती. सार्वजनिक विभागाने जे पत्र दिले आहे ते वाचुन दाखवतो. वरील विषयी कळवण्यात येते की, पैठण आपेगाव प्राधिकरणातील कंत्राटदार जीएनआय इंफ्रास्ट्रक्चर प्राव्हेट लिमिटेड व मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची पैठण आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामात कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

मा.सभापती : ते ब्लॅकलिस्टेड नाही असे त्या विभागाचे म्हणणे आहे. सिडकोचे काय पत्र आहे. जीएनआय आणि मस्कट या दोन्ही साठी अभिप्राय आहे का?

कार्यकारी अभियंता : पत्रामध्ये त्यांनी नमुद केले आहे.

मा.सभापती : मागच्या आठ दहा दिवसापासुन वृत्तपत्रामार्फत ब्लॅकलिस्टेड कंपनीला महानगरपालिका प्रशासन काम देते असे येत असतांना महापालिकेच्या पीआरओ ने किंवा आपल्या मार्फत एखादे पत्र का दिले नाही. तुम्ही सांगत आहेत की, कंपनी ब्लॅकलिस्टेड नाही मग हे वृत्तपत्राच्या माध्यमातुन येणे अपेक्षित होते.

श्री.गजानन बारवाल : मा.आयुक्तांनी यामध्ये चौकशी केली आहे. हे सर्वसामान्य जनतेसमोर येणे अपेक्षित होते.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : प्रत्येक काम ब्लॅकलिस्टेड कंपनीलाच दिले जाते.

मा.सभापती : खुलासा करण्यात आला आहे की, कंपनी ब्लॅकलिस्टेड नाही.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : प्रशासनाने त्यांच्याकडुन व्यवस्थित पणे काम करुन घेतले पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : यामध्ये खुलासा झाला आहे. विषय पत्रिका घेण्यात यावी.

**<u>विषय क्र. ११६ :</u>**

**विषय :- शासन अनुदान अंतर्गत शहरातील विविध रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉँक्रीट करणे बाबत बी-२ निविदेतील (पॅकेज P-1) या कामासाठी प्राप्त L1 निविदा मे. जी. एन. आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची असून त्यांनी बाबनिहाय भरलेले दर हे निविदा अटी व शर्ती नुसार १२% वस्तु व सेवा कर (GST) सह आहे. यानुसार प्राप्त निविदा रक्कम ही रक्कम रु.२१,७५,५६,०३९.९०/- इतकी असून ती प्रसिध्द निविदा रक्कम रु.१९,५७,७८,९६२/- पेक्षा ११.१२% जास्त आहे. सदर कामाचे L1 निविदाधारक यांनी भरलेले बाबनिहाय दराची तपासणी केली असता हे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा काही दर कमी व काही दर जास्तीचे असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे निविदाधारक यांच्याशी दर वाटाघाटी करीता गठीत निविदा निवड समिती समोर बोलविले असता त्यांनी Quoted Rate मध्ये बदल करण्यास असमर्थता दर्शविली या वेळी शासन निर्णय नुसार निविदा रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेची निविदा स्विकृत करता येणार नाही या बाबत गठीत निविदा निवड समितीने संबंधीत कंत्राटदार यांना निदर्शनास आणून दिले. यानुसार संबंधीत कंत्राटदारानी कमी असणारे Quoted Rate तसेच ठेवले व जास्तीचे असणारे काही दर कमी केले व काही दर जास्तीचे ठेवले अश्या प्रकारे दर वाटाघाटी अंती बाब निहाय दराची येणारी एकूण निविदा रक्कम रु.१९,४०,३४,७८४.४०/- इतकी असून ती प्रसिध्द निविदा रक्कमेच्या ०.८९०९% इतकी कमी येत आहे.**

तसेच सदरील L1 निविदाधारक यांच्या विरुध्द पैठण - आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामात निकृष्ट दर्जाचे काम केल्या बाबत त्यांची चौकशी सुरु असून या आधारे त्यांनी काळया यादीत टाकण्यात आले आहे अशी तक्रार प्राप्त असून या तक्रारीच्या अनुषंगाने पैठण - आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामा संदर्भाने मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/१२/२०१७ रोजी झालेल्या बैठकी मध्ये संबंधीतांना भविष्यात विषयांकीत प्राधिकरणा मध्ये काम देण्यात येऊ नये असा निर्णय झालेल्या असल्याचे नमुद केलेले असून या तक्रारीच्या अनुषंगाने L1 निविदाधारक व सक्षम प्राधिकरण यांना पत्र देऊन खुलासा मागविला असता त्यांनी खुलासा सादर केलेला आहे की,सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद व सिडको कार्यालया यांनी L1 निविदाधारक यांना प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने काळया यादीत व Debarred नसल्या बाबतचा खुलासा दिला आहे.

तरी उपरोक्त खुलासा व जिल्हाधिकारी यांच्या बैठकीच्या अनुषंगाने या कामाचे L1 निविदाधारका मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची दर वाटाघाटी अंती निविदा रक्कमेपेक्षा ०.८९०९% कमी दराची निविदा बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभे समोर ठेवणेस्तव सादर.

संदर्भ :- टेंडर आय.डी. क्र. 2018_AMCA_329632_1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | प्र. कार्यकारी अभियंता (शा.अ.प्र.) |
| २ | कामाचे स्वरुप | शासन अनुदान अंतर्गत शहरातील विविध रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे बाबत |
| | | (पॅकेज P-1) |
| | | १. चिकलठाणा शासकीय रुग्णालय पासून चौधरी कॉलनीपर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | २. बजरंग चौक पासून चिश्तीया कॉलनी पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ३. जयभवानी चौक ते सैनिक वे पुला पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ४. चिकलठाणा आठवडी बाजार पासून सावंगी बायपास पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ५. महाराष्ट्र डिस्टीलेरिस पासून ब्लू बेल्स रेसिडेन्सी पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ६. एन-१ पोलीस चौकी पासून प्रोझोन मॉल पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ७. आंबेडकर चौक पासून मिसरवाडी पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, एकत्रीत रक्कम रु.९९.८४५ कोटी शासकीय अनुदानातून मा. सर्वसधारण सभे मधील विषय क्र.११८६ दि.२०/०७/२०१७ नुसार मंजूर ठराव |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रु. १९,५७,७८,९६२/- (पॅकेज P-1) |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती | • जिल्हास्तरावरील वर्तमानपत्रे मराठी- |

| | | |
|---|---|---|
| | त्यांची नावे व प्रसिध्दचा दिनांक | ०२<br>• राज्यस्तरावरील वर्तमानपत्रे मराठी-०२, हिंदी-०२, इंग्रजी-०२<br>• राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रे हिंदी-०२, इंग्रजी-०२,<br>• संकेतस्थळ - महा ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.०५/०७/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०३/०८/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०६/०८/२०१८ |
| ६ | एकुण किती टेंडर्स आली? | तीन |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रु. | टक्केवारी |
| १ | मे. जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | १९५७७८९६२.०० | २१७५५६०३९.९० | ११.१२% जास्त |
| २ | मे. जे. पी. इन्टरप्राईजेस | १९५७७८९६२.०० | २३८६५६४५१.५० | २१.९०% जास्त |
| ३ | मे. ब्रिजगोपाल कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि. | १९५७७८९६२.०० | २३९९३४६५५.३० | २२.५५% जास्त |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | -- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शासकीय अनुदान |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | -- |
| १० | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| | उपरोक्त कामा विषयी बी-२ स्वरुपाची निविदा मागवितांना सर्व करा सह दर मागविण्यात आलेले आहेत. त्यामुळे पी-१ पॅकेजचे L1 निविदाधारक यांनी १२% वस्तु व सेवा कर (GST) सह दर भरणा केल्यामुळे ११.१२% निविदा रक्कमेपेक्षा जास्त दराची निविदा L1 निविदाधारक मे.जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची प्राप्त आहे. परंतू शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ यामध्ये Clause 5.4 अन्वये वस्तु व सेवा कर संदर्भाने कंत्राटदारांनी त्यापृष्ठयर्थ परिपुर्ण कागदपत्रे सादर केल्यानंतर देयकाची छाननी करुन कंत्राटदारास अदा करावीत अशी तरतुद आहे.<br>या शासन निर्णया आधारे L1 निविदाधारक मे. जी. एन. आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेशी दर वाटाघाटी केली असता त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीचे १२% वस्तु व सेवा कर (GST) सह भरणा केलेले दर कमी केले असून यानुसार येणारी रक्कम निविदा रक्कमेपेक्षा ०.८९०९% कमी येत | |

आहे. सदर दर वाटाघाटी करतांना १२% वस्तु व सेवा कर (GST) वगळून शासन निर्णय आधारे नमुद अटीस अधिन राहून करण्यात आली आहे. निविदाधारक यांनी त्यांच्या पत्रामध्ये In this Quoted tender 6% CGST and SGST are shown separately as GST & SGST will also be paid by the Corporation along with the payment अशी मागणी केलेली आहे. या संदर्भाने शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ मध्ये Clause 5.4 अन्वये असलेल्या नमुद तरतुदी नुसार वस्तु व सेवा कर (GST) बाबत गठीत निविदा निवड समितीने निर्णय घेतलेला आहे.

तसेच सदरील L1 निविदाधारक यांच्या विरुध्द पैठण - आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामात निकृष्ट दर्जाचे काम केल्या बाबत त्यांची चौकशी सुरू असून या आधारे त्यांनी काळया यादीत टाकण्यात आले आहे अशी तक्रार प्राप्त असून या तक्रारीच्या अनुषंगाने पैठण - आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामा संदर्भाने मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/१२/२०१७ रोजी झालेल्या बैठकी मध्ये संबंधीतांना भविष्यात विषयांकीत प्राधिकरणा मध्ये काम देण्यात येऊ नये असा निर्णय झालेल्या असल्याचे नमुद केलेले असून या तक्रारीच्या अनुषंगाने तसेच सिडको कार्यालया तर्फे काळया यादीत समाविष्ट केल्या बाबतची तक्रार असून या संदर्भाने L1 निविदाधारक तसेच संबंधीत सक्षम प्राधिकरण सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद व सिडको कार्यालय, औरंगाबाद यांना या कार्यालयातर्फे पत्र देऊन प्रकरणी खुलासा मागविण्यात आला असता L1 निविदाधारक यांनी त्यांचे दि.२६/१०/२०१८ च्या खुलाश्यात त्यांना सार्वजनिक बांधकाम विभाग व सिडको कार्यालय या विभागांनी Black Listed व Debarred नसल्याचे कळवून नुकतेच सार्वजनिक बांधकाम विभागा व सिडको कार्यालयाने कामे प्रदान करण्यात आल्याचे नमुद केले आहे. तसेच कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने रस्त्यांचे कामी दर्जा व गुणवत्तेबाबत कसल्याही प्रकारची कायदेशीर कार्यवाही प्रलंबित नाही.तसेच काळयायादीत टाकलेले नाही.भविष्यात अश्याप्रकारची कार्यवाही आमच्याविरुध्द झाल्यास आम्ही वेळोवेळी या कार्यालयास कळवू असे नोंदनीकृत शपथपत्र संबंधीत कंत्राटदार यांनी दिले आहे.

त्याचप्रमाणे उक्त नुसार सक्षम प्राधिकरण सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी पैठण - आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामा बाबत कंत्राटदार जी. एन. आय. इन्फ्रास्ट्रक्चर यांची रस्ते कामा निकृष्ट दर्जाचे काम केल्या बाबत लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे. तथापी काळया यादीत टाकण्यात आले नाही असे पत्रात नमुद केले आहे. तसेच सिडको कार्यालयातर्फे कंत्राटदार जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना Debarred केल्या बाबतचा तक्रारीच्या अनुषंगाने संबंधीत विभागाने दि.२२/१०/२०१८ रोजी खुलासा सादर केला असता संबंधीत कंत्राटदार यांना या कार्यालया तर्फे Revoke केले असून संबंधीतांने कामे पुर्ण केल्याचे पत्रात नमुद आहे.

सदर रस्त्याच्या प्रकल्पा करीता शासना कडून निधी दि.१९/०८/२०१७ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त होणे करीता मंजूरी होऊन एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे व शहरातील रस्त्यांची कामे करणे आवश्यक असल्यामुळे या कामास होणारा विलंब पाहता सदरील कामे होण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदरील कामाची गुणवत्ता बद्दल निविदेमध्ये Third Party Inspection चा Clause ठेवलेला आहे. त्याशिवाय विभागा मार्फत ही रस्त्याच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यात येईल.

मे. जी. एन. आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी बाब निहाय दर वाटाघाटी अंती निविदा रक्कमेच्या ०.८९०९% कमी दराने म्हणजेच १९,४०,३४,७८४.४०/- पर्यंत करणेस संमती पत्र दिले असून यामध्ये In this Quoted tender 6% CGST and SGST are shown separately as GST & SGST will also be paid by the Corporation along with the payment अशी मागणी केलेली आहे. यास विचारार्थ तथा गठीत निविदा निवड समिती व शासन निर्णया आधारे १२% वस्तु व सेवा कर (GST) प्रत्यक्ष देयक रक्कमेवर न देता या बाबत शासन निर्णय नमुद नुसार अथवा GST कार्यालया कडून मार्गदर्शन मागवून त्यांचे कडून प्राप्त मार्गदर्शना नुसार कंत्राटदारास देय राहील.

| | |
|---|---|
| | **उपरोक्त नमुद केल्या प्रमाणे L1 निविदाधारक मे. जी. एन. आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची निविदा रक्कमेपेक्षा ०.८९०९% कमी दराची निविदा असल्यामुळे आणि त्यांच्याबाबत तक्रारीच्या अनुषंगाने समाधानकारक खुलासा प्राप्त असल्यामुळे आणि विशेषत: शहरातील रस्त्याची कामे होण्याच्या दृष्टीने आणि कामाच्या गुणवत्तेबद्दल काळजी घेतली गेल्यामुळे त्यांच्या निविदा बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवणेस्तव सादर.** |

श्री.गजानन बारवाल : मा.न्यायालयात काय झाले? कंपनी ब्लॅकलिस्ट आहे की नाही याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : मा.न्यायालयामध्ये काय झाले त्याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता : मा.उच्च न्यायालयामध्ये श्री.रुपेन जैस्वाल यांच्या विरुध्द महानगरपालिका व इतर यांची पीआयएल रस्त्याच्या खड्डयांबाबत आणि रस्त्यांबाबत तीन वर्षापासुन चालु आहे. या पीआयएलमध्ये मागच्या तारखेला मा.उच्च न्यायालयामध्ये संबंधीताने असे सादर केले की, शंभर कोटीचे रस्ते महानगरपालिकेतर्फे होत नाहीये. या संदर्भात मा.न्यायालयाने मागच्या तारखेला असे आदेश दिले की, २ नोव्हेंबर पर्यंत महानगरपालिकेने निर्णय घ्यावा.नसता सदरील काम महानगरपालिकेकडुन पीडब्ल्युडीला देण्यात येईल. त्या संबंधाने आज मा.न्यायालयामध्ये तारीख होती. मा.स्थायी समितीमध्ये जे चार प्रस्ताव ठेवलेले आहेत ते मा.न्यायालयामध्ये सादर केले. त्यांनी विचारणा केली की, यावर काय निर्णय घेणार आहे? मा.न्यायालयास सांगण्यात आले की, सभा चालु आहे निर्णय होईल. यावर मा.न्यायालयाने सांगितले की, आज निर्णय घ्यावा, असे आदेशित केले आहे. आणि सुनावणीची पुढील तारीख २१ नोव्हेंबर ठेवलेली आहे.

श्री.गजानन बारवाल : चारपैकी काही कंपनी ब्लॅकलिस्टेड का आहे?

मा.सभापती : वृत्तपत्रामध्ये वाचले की काही कंपन्या ब्लॅकलिस्टेड आहे. अनेक लोकप्रतिनिधी यांनी महापालिका प्रशासनाला या संदर्भात पत्र दिले आहे. त्यामध्ये स्पष्ट असे म्हंटले आहे की, सदरील कंपन्या ब्लॅकलिस्टेड असतांना त्यांना काम का देण्यात येत आहे? या चारही प्रस्तावाच्या अनुषंगाने कुठलीही कंपनी ब्लॅकलिस्टेड आहे का? याबाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता : महानगरपालिकेतर्फे शंभर कोटी रस्त्याच्या कामाची पी-१, पी-२, पी-३, पी-४ अशी चार वर्गवारी करण्यात आली आहे. याची एकुण किंमत साधारणत: ९९ कोटी आहे. चार एजन्सी वेगवेगळ्या प्रमाणे घेतल्या आहेत. त्यातील दोन एजन्सी जीएनआय इन्फ्रास्ट्रक्चर आणि मस्कट कंस्ट्रक्शन यांचेसंदर्भात वारंवार तक्रारी आल्या की, ह्या ब्लॅकलिस्ट असतांना महानगरपालिका यांना काम देत आहे. ब्लॅकलिस्ट असल्याची माहिती महापालिकेला नाही. तक्रारी प्राप्त झाल्यावर संबंधीताने पैठण-आपेगाव प्राधिकरणाचे काम करणारे कार्यकारी अभियंता सार्वजनिक विभाग बांधकाम विभाग औरंगाबाद यांना व सिडको विभागाला पत्र देण्यात आले की, आपण यांना ब्लॅकलिस्ट केले आहे का? याची माहिती त्यांच्याकडुन मागवण्यात आली असता, त्यांनी आपल्या पत्राच्या उत्तरी सिडकोने दि.२२.१०.२०१८ रोजी व सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद, येथील कार्यकारी अभियंता यांनी दि.२२.१०.२०१८ रोजी पत्राद्वारे कळविले आहे की हे ब्लॅकलिस्ट नाहीये.

श्री.गजानन बारवाल : त्यांना ब्लॅकलिस्ट कोणी केले होते?

कार्यकारी अभियंता : ब्लॅकलिस्ट केले होते किंवा नव्हते यांची माहिती नाहीये. पत्राद्वारे जी माहिती प्राप्त झाली आहे, त्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना विचारणा केली होती. सार्वजनिक विभागाने जे पत्र दिले आहे ते वाचुन दाखवतो. वरील विषयी कळवण्यात येते की, पैठण-आपेगाव प्राधिकरणातील कंत्राटदार जीएनआय इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची पैठण-आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामात निकृष्ठ दर्जाचे काम केल्या बाबत

लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयामार्फत (ए.सी.बी.) चौकशी करण्यात आली आहे. तथापी त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले नाही. करीता माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

मा.सभापती : ते ब्लॅकलिस्टेड नाही असे त्या विभागाचे म्हणणे आहे. सिडकोचे काय पत्र आहे. जीएनआय आणि मस्कट या दोन्ही साठी अभिप्राय आहे का?

कार्यकारी अभियंता : पत्रामध्ये त्यांनी नमुद केले आहे.

मा.सभापती : मागच्या आठ दहा दिवसापासुन वृत्तपत्रामार्फत ब्लॅकलिस्टेड कंपनीला महानगरपालिका प्रशासन काम देते असे येत असतांना महापालिकेच्या पीआरओ ने किंवा आपल्या मार्फत एखादे पत्र का दिले नाही. तुम्ही सांगत आहेत की, कंपनी ब्लॅकलिस्टेड नाही मग हे वृत्तपत्राच्या माध्यमातुन येणे अपेक्षित होते.

श्री.गजानन बारवाल : मा.आयुक्तांनी यामध्ये चौकशी केली आहे. हे सर्वसामान्य जनतेसमोर येणे अपेक्षित होते.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : प्रत्येक काम ब्लॅकलिस्टेड कंपनीलाच दिले जाते.

मा.सभापती : खुलासा करण्यात आला आहे की, कंपनी ब्लॅकलिस्टेड नाही.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : प्रशासनाने त्यांच्याकडुन व्यवस्थितपणे काम करुन घेतले पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : यामध्ये खुलासा झाला आहे. विषय पत्रिका घेण्यात यावी.

मा.सभापती : विषय क्र.११६.

श्री.गजानन बारवाल : यामध्ये वाटाघाटी केल्यानंतर १९,४०,३४,७८४.४०/- इतकी असुन ती प्रसिध्द निविदा रक्कमेच्या ०.८९०९ टक्के इतकी कमी येत आहे. यात विशेष अंकुश असणे गरजेचे आहे. मा.मुख्यमंत्री साहेबांनी यावर लक्ष दिल्यानंतर या वाटाघाटी झाल्या आहेत.

मा.सभापती : विषय क्र.११६ मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, **शासन अनुदान अंतर्गत शहरातील विविध रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे बाबत बी-२ निविदेतील (पॅकेज P-1) या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी प्रसिध्द झालेल्या निविदा रक्कमेपेक्षा ११.१२% जास्त दराची निविदा L1 निविदाधारक मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेशी झालेल्या बाबनिहाय दर वाटाघाटीअंती संबंधीत कंत्राटदाराने कमी असणारे** Quoted Rate **तसेच ठेवले व जास्तीचे असणारे काही दर कमी केले व काही दर जास्तीचे ठेवले. यानुसार दर वाटाघाटीअंती बाबनिहाय दराची एकूण निविदा रक्कम रू.१९,४०,३४,७८४.४०/- इतकी असून ती प्रसिध्द निविदा रक्कमेपेक्षा ०.८९०९% कमी येते. त्या मर्यादेत कामे करण्यास मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी संमती पत्र दिले असल्यामुळे त्यांचेकडून सदरील कामे करून घेणेस व यामध्ये** In this Quoted tender 6% CGST and SGST are shown separately as GST & SGST will also be paid by the Corporation along with the payment **अशी मागणी केलेली असल्याने, शासन निर्णया आधारे १२% वस्तु व सेवा कर (GST) प्रत्यक्ष देयक रक्कमेवर न देता या बाबत शासन निर्णय नमुद नुसार तसेच याबाबत शासनाचे वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार अथवा GST कार्यालया कडून मार्गदर्शन मागवून त्यांचे कडून प्राप्त मार्गदर्शना नुसार कंत्राटदारास देय राहील,यासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. ११७ :</u>**

**विषय :- शासन अनुदान अंतर्गत शहरातील विविध रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे बाबत बी-२ निविदेतील (पॅकेज P-2) या कामासाठी प्राप्त L1 निविदा मे.जे.पी.इन्टरप्राईजेस यांची असून त्यांनी बाबनिहाय भरलेले दर हे निविदा अटी व शर्ती नुसार १२% वस्तु व सेवा कर (GST) सह आहे. यानुसार प्राप्त निविदा रक्कम ही रक्कम रु.२४,५९,२१,७१७/- इतकी असून ती प्रसिध्द निविदा रक्कम रु.२०,५३,१४,६७९/- पेक्षा १९.७८% जास्त आहे. सदर कामाचे L1 निविदाधारक यांनी भरलेले बाबनिहाय दराची तपासणी केली असता हे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा काही दर कमी व काही दर जास्तीचे असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे निविदाधारक यांच्याशी दर वाटाघाटी करीता गठीत निविदा निवड समिती समोर**

बोलविले असता त्यांनी Quoted Rate मध्ये बदल करण्यास असमर्थता दर्शविली या वेळी शासन निर्णय नुसार निविदा रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेची निविदा स्विकृत करता येणार नाही या बाबत गठीत निविदा निवड समितीने संबंधीत कंत्राटदार यांना निदर्शनास आणून दिले. यानुसार संबंधीत कंत्राटदारानी कमी असणारे Quoted Rate तसेच ठेवले व जास्तीचे असणारे काही दर कमी केले व काही दर जास्तीचे ठेवले अश्या प्रकारे दर वाटाघाटी अंती बाब निहाय दराची येणारी एकूण निविदा रक्कम रु.२०,२६,१२,९६२.४०/- इतकी असून ती प्रसिध्द निविदा रक्कमेच्या १.३१% इतकी कमी येत आहे.

तसेच सदरील कामात L3 निविदाधारक मे. जी. एन. आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांच्या विरुध्द पैठण - आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामात निकृष्ट दर्जाचे काम केल्या बाबत त्यांची चौकशी सुरू असून या आधारे त्यांनी काळया यादीत टाकण्यात आले आहे अशी तक्रार प्राप्त असून या तक्रारीच्या अनुषंगाने पैठण - आपेगाव प्राधिकरणातील रस्ते कामा संदर्भाने मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/१२/२०१७ रोजी झालेल्या बैठकी मध्ये संबंधीतांना भविष्यात विषयांकीत प्राधिकरणा मध्ये काम देण्यात येऊ नये असा निर्णय झालेल्या असल्याचे नमुद केलेले असून या तक्रारीच्या अनुषंगाने L3 निविदाधारक व सक्षम प्राधिकरण यांना पत्र देऊन खुलासा मागविला असता त्यांनी खुलासा सादर केलेला आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद व सिडको कार्यालया यांनी L3 निविदाधारक यांना प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने काळया यादीत व Debarred नसल्या बाबतचा खुलासा दिला आहे.

तरी उपरोक्त L3 निविदाधारक यांचा खुलासा व जिल्हाधिकारी यांच्या बैठकीच्या अनुषंगाने या कामाचे L1 निविदाधारका मे. जे. पी. इन्टरप्राईजेस यांची दर वाटाघाटी अंती निविदा रक्कमेपेक्षा १.३१% कमी दराची निविदा बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा निर्णयास्तव मा. स्थायी समिती सभे समोर ठेवणेस्तव सादर.

संदर्भ :- टेंडर आय.डी. क्र. 2018_AMCA_329632_2

| १ | खात्याचे नांव | प्र. कार्यकारी अभियंता (शा.अ.प्र.) |
|---|---|---|
| २ | कामाचे स्वरुप | शासन अनुदान अंतर्गत शहरातील विविध रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे बाबत |
| | | (पॅकेज P-2) |
| | | १. सोहम मोटर्स जालना रोड पासून महालक्ष्मी चौक पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | २. शाहूनगर (रामनगर) पासून ते मोर्या मंगल कार्यालय १२ वी योजना सिडको पर्यंत विश्रांतीनगर व सदाशिवनगर मार्गे रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ३. कामगार चौक पासून ते हायकोर्ट पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ४. धुत हॉस्पिटल पासून मुर्तुजापूर पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ५. अहिल्यादेवी होळकर चौक पासून रेल्वे पट्टरी विश्रांतीनगर पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| | | ६. जानकी हॉटेल पासून मेहेरसिंग नाईक शाळेपर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपिंग कॉंक्रीट करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, एकत्रीत रक्कम रु.९९.८४५ कोटी शासकीय अनुदानातून मा.सर्वसधारण सभे मधील विषय |

| | | |
|---|---|---|
| | | क्र.११८६ दि.२०/०७/२०१७ नुसार मंजूर ठराव. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रु.२०,५३,१४,६७९/- (पॅकेज P-2) |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दचा दिनांक | • जिल्हास्तरावरील वर्तमानपत्रे मराठी-०२<br>• राज्यस्तरावरील वर्तमानपत्रे मराठी-०२, हिंदी-०२, इंग्रजी-०२<br>• राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रे हिंदी-०२, इंग्रजी-०२,<br>• संकेतस्थळ - महा ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.०५/०७/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०३/०८/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०६/०८/२०१८ |
| ६ | एकुण किती टेंडर्स आली? | तीन |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रु. | टक्केवारी |
| १ | जे.पी. इन्टरप्राईजेस | २०५३१४६७९.०० | २४५९२३७१७.०० | १९.७८% जास्त |
| २ | ब्रिजगोपाल कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि. | २०५३१४६७९.०० | २५१२५२६४०.८० | २२.३७% जास्त |
| ३ | जी.एन.आय. इन्फ्रा प्रा. लि. | २०५३१४६७९.०० | २५२६१५२३७.५० | २३.०४% जास्त |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | -- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शासकीय अनुदान |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | -- |
| १० | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| | उपरोक्त कामा विषयी बी-२ स्वरुपाची निविदा मागवितांना सर्व करा सह दर मागविण्यात आलेले आहेत. त्यामुळे पी-२ पॅकेजचे L1 निविदाधारक यांनी १२% वस्तु व सेवा कर (GST) सह दर भरणा केल्यामुळे १९.१७% निविदा रक्कमेपेक्षा जास्त दराची निविदा L1 निविदाधारक जे.पी.इन्टरप्राईजेस यांची प्राप्त आहे. परंतू शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ यामध्ये Clause 5.4 अन्वये वस्तु व सेवा कर संदर्भाने कंत्राटदारांनी त्यापृष्ठयर्थ परिपुर्ण कागदपत्रे सादर केल्यानंतर देयकाची छाननी करून कंत्राटदारास अदा करावीत अशी तरतुद आहे.<br>या शासन निर्णया आधारे L1 निविदाधारक मे. जे. पी. इन्टरप्राईजेस यांचेशी दर वाटाघाटी | |

| | |
|---|---|
